# ‘खोक्या’ची हद्दपारी कोणी थांबवली?

## अभय कोणाचे? पोलिसांनी पाठविलेला मपोका ५६ चा प्रस्ताव बीडच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे वर्षापासून धूळखात



### काय आहे कायदा ?

महाराष्ट्र पोलिस कायदा ५६ व ५७ अंतर्गत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीएम) गुन्हेगारांचे प्रस्ताव पाठवून मान्यता घेत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार केले जाते. जे टोळी करून गुन्हा करतात अशांना महाराष्ट्र पोलिस कायदा ५५ अंतर्गत पोलिस अधीक्षक हद्दपार करतात.

### कलेक्टर सकारात्मक, एसडीओला काय अडचण?

पोलिस अधीक्षकांनी एखाद्या गुंडाचा प्रस्ताव पाठविल्यावर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडून तातडीने कारवाई करून प्रस्ताव निकाली काढला जातो. परंतु, उपविभागीय अधिकारी हद्दपारीचे प्रस्ताव वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवतात. त्यांनी सकारात्मक किंवा नकारात्मक कारवाई करून निर्णय घेणे अपेक्षित आहे. परंतु, तसे होताना दिसत नाही. त्यामुळेच एसडीओंना नेमकी अडचण काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

### हद्दपारीच्या प्रस्तावाची माहिती घेतो

सतीश भोसले याचा व्हिडिओ व्हायरल होताच शिरूर पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. त्याचा शोधही सुरू आहे. परंतु, हद्दपारीच्या प्रस्तावाची माहिती घेतो. त्यानंतरच आपल्याला प्रतिक्रिया देतो.
– नवनीत काँवत, पोलिस अधीक्षक बीड

### लवकरच निर्णय होईल

सतीश भोसले याचा प्रस्ताव आहे. परंतु, मध्यंतरी लिपिक एसीबीच्या ट्रॅपमध्ये अडकला आणि नंतर निवडणुकाही लागल्या. परंतु, त्याला प्रलंबित म्हणता येणार नाही. लवकरच त्यावर निर्णय होईल. – कविता जाधव, उपविभागीय अधिकारी बीड

बीड । दिव्य न्युज

भाजपचे आ. सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेल्या कुख्यात सतीश ऊर्फ खोक्या भोसले याला जिल्ह्यातून हद्दपार करावे, यासाठी पोलिसांनी बीडच्या उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. परंतु वर्षापासून त्यावर काहीही कारवाई न करता तो धूळ खात पडून आहे. त्यामुळेच खोक्याचे मनोबल वाढले आणि तो गुन्हेगारी करत राहिला, असा आरोप होत आहे.

दारू, वाळू, हातभट्टी, गुटखा माफियांसह इतर गुन्हे करणाऱ्यांची कुंडली काढून पोलिसांकडून त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीओ) यांच्याकडे प्रस्ताव पाठविला जातो. परंतु, त्यांच्याकडून कारवाई केली जात नसल्याने हे प्रस्ताव धूळ खात पडून राहतात. आपले काहीच होत नाही, असे समजून हे गुन्हेगार पुन्हा गुन्हे करत राहतात. जानेवारी २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीतील ११८ प्रलंबित प्रस्ताव असलेल्या २१ गुन्हेगारांनी जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरीसह इतर गंभीर गुन्हे केल्याचे सूत्रांनी सांगितले. आ. सुरेश धस यांचा कार्यकर्ता खोक्याने देखील प्रस्ताव प्रलंबित असल्यापासून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यासह इतर गुन्हे केल्याचे सांगण्यात आले.

बीडमध्येच जास्त प्रलंबित

बीड उपविभागात सर्वाधिक ६४ प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यानंतर पाटोदा १६, अंबाजोगाई २२, परळी ९, माजलगाव ७ यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

खोक्याला कोणाचा आशीर्वाद?

खोक्याविरोधात अनेक गुन्हे असल्याने त्याला जिल्ह्यातून हद्दपार करावे, यासाठी सप्टेंबर २०२३ मध्ये पोलिस अधीक्षकांकडे प्रस्ताव पाठविला. तेथून तो आष्टीच्या उपअधीक्षकांकडे गेला, परंतु शिरूर पोलिस ठाणे हे बीड उपविभागात येत असल्याने त्यांनी तो परत एसपींकडे पाठविला. मग तो बीड उपअधीक्षक यांच्याकडे पाठवून चौकशी केली. सर्व अंतिम चौकशी करून हा प्रस्ताव मार्च २०२४ मध्ये बीडच्या एसडीओंकडे गेला. तेव्हापासून तो त्यांच्या कार्यालयात धूळ खात पडून आहे.

---

## जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक वेळेवर उपस्थित नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान




बीड । दिव्य न्युज

तालुक्यातील बाळापूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक उशिरा येण्याचे प्रमाण वाढले असून याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. वेळेवर वर्ग न भरल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे शाळेच्या वेळेत बदल करण्यात आला असून, सकाळी ९ ते १२ या वेळेत शाळा भरत आहे. मात्र, बाळापूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक वेळेवर पोहोचत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, शाळेतील काही शिक्षक नियमितपणे उशिरा पोहोचतात, त्यामुळे पहिल्या काही तासांमध्ये विद्यार्थी वाऱ्यावर सोडले जातात. अनेक वेळा पालकांनी याबाबत तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. शाळेतील व्यवस्थापनाने यावर लक्ष घालण्याची मागणी होत असून संबंधित शिक्षण विभागाने याची तत्काळ दखल घ्यावी, अशी अपेक्षा पालक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

## जिंतूर येथे धम्म संस्कार शिबीर संपन्न



जिंतूर । दिव्य न्युज

जिंतूर येथे सम्राट अशोक बुद्ध विहार येथे एक दिवशीय धम्म संस्कार शिबिर घेण्यात आले शिबिराचे मुख्य मार्गदर्शक व मुख्य धम्मदेशना भंते महावीरो थेरो काळेगाव जिल्हा अहमदपूर भंते संघरत्न आम्रवण महाविहार देवगाव फाटा यांच्या नेतृत्वात अतिशय धम्ममय वातावरणात खूप चांगल्या प्रकारे पार पडले जिंतूर तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी खूप मोठ्या प्रमाणात येऊन शिबिराचा लाभ घेतला व आपले पुण्य संपादन केले या शिबिराचे आयोजन जिंतूर तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मिळून केले होते यामध्ये मुख्याध्यापक संभाजी खिल्लारे, नामदेव प्रधान ,लांडगे सर ,आनंद वाकळे, सावंत सर, दांडगे सर ,बंड साहेब ,वानखेडे साहेब, आशाताई खिल्लारे, प्रतिभा हरभरे, विमल वाहळे, लक्ष्मीबाई कांबळे, सुकेशनी प्रधान ,सुमन लाटे ,सुनिता पाटील ,विमल प्रधान, संगीता ठोके ,शेवंता प्रधान ,उबाळे ताई, कौशल्या वाकळे ,पुष्पा माहुरे, प्रीती लांडगे, शोभा वाघमारे, महिंद्र बनसोडे, मंगल भवाळे अश्वजीत खिल्लारे , भारशंखर सर, अंभोरे सर, मस्के सर,सुर्यवंशी काका, पंडीत सर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

---

## पैठण शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करुन सुरक्षा कक्ष उभारा-ॲड.सुभाष खडसन

पैठण । दिव्य न्युज :
व्ही.एन.खंडागळे

पैठण शहर हे ऐतिहासिक,धार्मिक तसेच पर्यटनस्थळ आसल्याने येथे लाखो भाविक भक्त दर्शनासाठी व पर्यटक पर्यटनस्थळांना भेटी देण्यासाठी येतात. तसेच शांती ब्रम्ह संत एकनाथ महाराज यांच्या नाथ षष्ठी यात्रेसाठी लाखों भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात येथे येणाऱ्या लोकांच्यामौल्यवान दाग दागिणे तसेच वस्तू चोरीला जाण्याचे प्रकार सर्रास घडत असतात. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या व नाथ षष्ठी उत्सवानिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने लाखों रूपये खर्चून शहरात लावलेले व सद्यस्थितीत बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालु करुन सुरक्षा कक्ष स्थापन करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन मुख्याधिकारी संतोष आगळे यांच्याकडे ड.सुभाष खडसन यांनी दिले आहे.



शालिवाहन राजाची राजधानी असलेल्या प्रतिष्ठान म्हणजेच पैठण शहराला धार्मिक व ऐतिहासीक ओळख आहेच परंतु जायकवाडीचे नाथसागर धरण, संत ज्ञानेश्वर उद्यान तसेच पालथी नगरी,नाग घाट विवीध ऐतिहासिक स्मारके,पुरातन मंदीरे मस्जिद,दर्गा तसेच संत एकनाथ महाराजांच्या घरासह त्यांचे समाधीस्थळ,संत ज्ञानेश्वरांनी रेड्या मुखी वेद वदवल्याले स्थळ यासह शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले भव्य असे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा तसेच मध्यवर्ती बस स्थानक परिसरातील परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेस्मारक आहे. परंतु काही वर्षांपूर्वी शहरभर मोठा गाजावाजा करून शहर परिसरात व मुख्य ठिकाणी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत आसल्याने महापुरुषांच्या स्मारकासह शहरातील नागरिकांच्या व येथे येणाऱ्या पर्यटक व भाविक भक्तांच्या सुरक्षिततेचा प्रश्न देखील निर्माण झालेला आहे. मागील काही दिवसांपासून शहरातील विविध भागातचोरी/घरफोडी, लुटमार होण्याचे संख्येत वाढ होताना दिसत आहे.त्यातच नाथ सागर जलाशयाच्या परिसरात व त्यामध्ये आत्महत्या व घात पाताच्या प्रकाराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. जर शहर व शहराच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे चालु असते तर शहरात घडणाऱ्या घटनांना काही प्रमाणत तरी आळा बसला असता. राज्यातील काही शहरामध्ये बलात्कार सारखे गंभीर स्वरूपाचे कृत्य व गुन्हे घडत असल्याचे दिसत आहे त्यामुळे महिला व प्रामुख्याने मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. तसेच यापूर्वी शासनाने शहर सुरक्षेतेच्या उपाय योजना करण्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे. तरी देखील शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडले असल्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आसल्याने उलट शासनाने दिलेला निधी नाहक खर्ची गेल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पैठण शहरांतील नागरिकांमध्ये न.प.करत असलेल्या कामाबाबत देखील प्रश्नचिन्ह निर्माण झालेला आहे. त्यामुळे पैठण शहरात येणाऱ्या भाविक भक्तांच्या तसेच पर्यटकांच्या व येथील नागरिकांच्या सुरक्षितते करीता शहरामध्ये ठिकठिकाणी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ सुरू करून सुरक्षा कक्ष उभारण्यात यावे अशी मागणी अँड. सुभाष खडसन यांनी मुख्याधिकारी संतोष आगळे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## १० वर्षीय आवेज आयुब शेखचा पहिला रोजा


मुखेड । दिव्य न्युज



मुस्लिम बांधवांसाठी पवित्र असलेला रमजान महिना सुरु असुन रविवार दि. ९ मार्च रोजी शहरातील व्यंकटेश नगर येथील ५वी वर्गात शिकणारा आवेज आयुब शेख याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा-उपवास ठेवला.

रमजान महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवतात. मन व शरीर शुद्ध करण्याचा तो एक मार्ग असल्यामुळे मुस्लिम धर्मात रोजाला विशेष महत्त्व आहे. सध्या मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता वाढली आहे. मुखेड शहरातील शेख आयुब यांचा १० वर्षाचा मुलगा आवेज आयुब शेख याने आपल्या आयुष्यातील रमजानचा पहिला रोजा उपवास ठेवल्याने त्याच्या सर्वत्र स्तरांतून कौतुक होत आहे.

## उमेहनी इम्रान शेख चा पहिला रोजा पूर्ण



बीड । दिव्य न्युज

उमेहनी इम्रान शेख नी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला रखरखत्या उन्हात रमजान बद्दल प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर दिवसभरात अन्नाचा एकही कन ना खाता व पाण्याचा घोट न पिता जवळपास दिवसाचे १३ तास उपाशी राहून ७ वर्षीय उमेहनी शेख दिलावर नगर यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केल्याने नातेवाईक व मित्रपरिवार यांनी शुभेच्छा दिल्या.

## मुसेफ बागवान याने वयाच्या आठव्या वर्षी आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण

सिल्लोड । दिव्य न्युज



सिल्लोड शहरातील आझाद नगर भागातील मुसेफ बागवान याने वयाच्या आठव्या वर्षी आयुष्यतील पहिला रोजा पुर्ण केला मुसेफ हा नगरसेवक आसिफ बागवान यांचा मुलगा आहे तसेच शहरातील ऑक्सफर्ड इंग्लिश शाळेतील दुसरीच्या वर्गात शिकणाऱ्या मुसेफ बागवान याच्या पहिला रोजाबद्दल त्याचे आई -वडील व नातेवाईकांनी त्याचे अभिनंदन केले पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या या बालकाने आपल्या कुटुंबियांसह आणि मित्र मंडळीसह इफ्तारच्या कार्यक्रमात सहभाग घेतला होता या प्रसंगी विशेष इफ्तारच्या आयोजन करण्यात आले होते ज्या मध्ये पेंड खजूर, व फळे ईतर पारंपरिक पदार्थांचा समावेश होता.

---

## अजितदादांनी ८२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आणि जलजीवन मिशनच्या कामांना निधी द्यावा या मागणीसाठी लक्ष्यवेधी विकासाचे गाजर वाटप आंदोलन

बीड । दिव्य न्युज

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार असून बीड जिल्ह्यातील ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रूपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने शासनाला दोन महिन्यांपासून केलेली असुनही अद्याप निधी मिळाला नाही. बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या कामांसाठी निधीचा तुटवडा निर्माण झाला असुन २५० कोटी रुपयांचा निधी शासनाने द्यावा अशी जिल्हा प्रशासनाकडुन शासनाला मागणी करण्यात येऊन केवळ १४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असुन तातडीने उर्वरित निधी देण्यात यावा या प्रमुख मागण्यांकडे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष्य वेधण्यासाठी आज दि.१० सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अजितदादांच्या विकासाचे गाजर वाटप लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार ,,शेख मुबीन,शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी अशोक येडे, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते.




बीड जिल्ह्यातील ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय अनुदानापासुन वंचित; आवश्यक १ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी तातडीने देण्यात यावा

बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे.यापैकी १०८ कुटुंबियांना मदत देण्यात आली असुन ६३ जणांना मिळणे बाकी आहे. मागच्या वर्षातील ६३ आणि चालु वर्षातील १७ अशी एकुण ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. महाराष्ट्र राज्याच्या तिजोरीची चावी हाती असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असुनही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असणे हि अशोभनीय बाब आहे . यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने करून दीड महिना उलटुनही अद्याप निधी मिळाला नाही.बीडच्या विकासाचे व्हिजन दाखवणा-या अजितदादांनी विकासाचे गाजर बीडकरांच्या हाती दिल्याची जनमाणसात भावना असुन तातडीने मदतनिधी द्यावा.

जलजीवन मिशनच्या कामांसाठी २५० कोटी निधीची मागणी असुन केवळ १४ कोटी प्राप्त, उर्वरित निधी द्यावा :- डॉ.गणेश ढवळे

केंद्र सरकारने हर घर जल देण्यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची योजना कार्यरत केली असुन बीड जिल्ह्यात १२२३ गाव आणि वाड्यांची संख्या आहे. पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी ११८४ जुन्या आणि आता नव्याने ८१ अशी एकूण १२६५ पाणीपुरवठा कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. यात ० ते २५ टक्के कामे झालेली ८६ तर २५ ते ५० टक्के कामे झालेली १८० तर ५० ते ७५ टक्के कामी झालेली ३८७ कामे तर ७५ ते ९९ टक्के कामे पूर्ण झालेली ३२७ कामे आहेत. यात २४६ कामे पुर्णत्वाकडे असून ३३ योजना ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेल्या आहेत. मागील ८ महिन्यापासून जलजीवन मिशन साठी निधीचा तुटवडा निर्माण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने २५० कोटी रुपये निधीची मागणी शासनाकडे केलेली आहे. मात्र केवळ १४ कोटी रुपये निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे पालकमंत्री बीड य अजित दादा पवार यांनी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला कोणत्या न्यायालयात चालणार?

बीड । दिव्य न्युज

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील खटला केज न्यायालया ऐवजी बीडच्या जिल्हा सत्र न्यायालयात चालवला जावा, असा विनंती अर्ज एसआयटीने न्यायालयात केला होता. या अर्जावर आज



सुनावणी झाली. त्यात पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने देशमुख हत्या प्रकरणातील खटला बीडच्या न्यायालयात चालवण्याची विनंती करण्यात आलेली आहे. आरोपींना बीड कारागृहातून केज येथे नेण्यास कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अडचणीने आहे. तसंच साक्षीदार देखील तिथेच आहेत. त्यामुळे ही मागणी एसआयटीने केली होती. त्यावर अद्याप निर्णय देण्यात आलेला नसल्याने तोवर हा खटला केज न्यायालयातच चालणार आहे. त्यामुळे संतोष देशमुख प्रकरणातील पहिली सुनावणी ही १२ मार्च रोजी केज न्यायालयातच होणार आहे.

# भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरल नाव

## रोहित शर्माने रचला इतिहास

दुबई(वृत्तसंस्था)

भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला. भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भारताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली.

न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये आता इतिहास रचला आहे. आतापर्यंत जी गोष्ट रोहित शर्माला कधीच करता आली नव्हती, ती रोहित शर्माने या सामन्यात करून दाखवली आहे.







## पाटोद्यातील दोन चिमुकल्यांचा पहिला रोजा पूर्ण

पाटोदा / दिव्य न्युज



मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा ( फर्ज ) सक्तीचे असतात.परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात . अश्याच प्रकारे पाटोदा शहरातील सख्या चुलत बहिण-भाऊ कु.माईरा अब्दुलअजिम शेख ( वय ९ वर्ष )अब्दुलनाफे मोहम्मद सुलेमान शेख ( वय १० वर्ष ) या बहिण-भावांनी त्यांच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे. या दोघांनी दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल त्यांच्या कुटुंबाच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीला मित्रपरिवार, नातेवाईक तसेच राजकीय, सामाजिक आदी क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून दोन्ही बहीण-भावाचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## शेख रमिज अहमद यांची मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन बीड जिल्हाध्यक्षपदी निवड

बीड । दिव्य न्युज


राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष आणि धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय शेख रमिज अहमद यांची मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे. संस्थापक अध्यक्ष सलीम सारंग यांनी त्यांची अधिकृत घोषणा केली.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संस्थापक आणि अजित पवार यांचे जवळचे सहकारी सलीम सारंग यांच्या विश्वासाला पात्र ठरून शेख रमिज अहमद यांच्यावर जिल्ह्यातील मुस्लिम समाजाच्या विकासाची जबाबदारी आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. रमिजं अहमद गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते आहेत त्यांच्या माध्यमातून



गोर गरीब आणि समाजाच्या शेवटच्या घटकांना नक्की या माध्यमांतून न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे सलीम सारंग साहेब यांनी एका सच्चा कार्यकर्त्याला या मोठ्या पदावर नियुक्त करून कामाची पावती दिली आणि मोठी जबाबदारी दिली असल्याने रमीज यांनी त्यांचे आभार मानले आहेत येणाऱ्या काळात सरकार च्या माध्यमातून आपल्या समाजाच्या मागण्या आणि प्रश्न सोडवून घेण्याची जबाबदारी आपल्यावर आली आहे नक्कीच पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करू असे देखील रमिज यांनी म्हंटले आहे. शेख रमिज अहमद हे सामाजिक कार्यात सक्रिय असून, मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील आहेत. त्यांच्या निवडीमुळे संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांची ही निवड नक्कीच संघटनेला बळ प्राप्त करून देईल व जिल्ह्यात संघटनात्मक बांधणी साठी फायद्याची ठरेल असे बोलले जात आहे.

## शीष अबरार सय्यद याचा वयाच्या आठव्या वर्षीचा पहिला रोजा पुर्ण



औरंगाबाद । दिव्य न्युज

फरहत नगर औरंगाबाद येथील शीष अबरार सय्यद यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला रखरखत्या उन्हात रमजान बद्दल प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर दिवसभरात अन्नाचा एकही कन ना खाता व पाण्याचा घोट न पिता जवळपास दिवसाचे १३ तास उपाशी राहून ८ व्या वर्षीय शीष अबरार सय्यद फरहत नगर औरंगाबाद यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केल्याने नातेवाईक व मित्रपरिवार यांनी शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.



अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी छातीवर आणि टेबलवर पहिल्या नावाची नेमप्लेट ठेवली आहे.

## बीडमध्ये पोलिसांच्या छातीवरील नेमप्लेटवरून आडनाव वगळले ; पोलीस अधीक्षकांची संकल्पना होतेय यशस्वी

बीड । दिव्य न्युज

आडनावावरून काही लोकांनी पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांवर जातीचे आरोप केले. हाच धागा पकडून पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी पहिल्या नावाने बोलण्यासह टेबलवर नेमप्लेट देण्याचा निर्णय घेतला. आता टेबलवर तर नेमप्लेट दिलीच परंतु छातीवरही पहिल्या नावाची प्लेट लागली आहे. अशी संकल्पना राज्यात पहिल्यांदाच बीडमध्ये राबविण्यात आली आहे.

जिल्ह्यात सध्या जातीयवाद वाढत चालला आहे. मागील आठवड्यापासून तर सोशल मीडियावर प्रचंड आरोप-प्रत्यारोप, अश्लील भाषा वापरली जात आहे. तसेच एखाद्याने पोलिसांबद्दल कॉमेंट्स केल्या जात आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही असे अनेकदा झाले होते. यावर नूतन पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी हा जातीयवाद संपविण्यासाठी पोलिस दलातील प्रत्येकाने एकमेकांना पहिल्या नावाने बोलण्याचा आदेश काढला. त्यानंतर त्यांना टेबलवर ठेवण्यासाठी पहिल्या नावाची नेमप्लेट दिली. परंतु त्यानंतरही आता एक पाऊल पुढे टाकत खाकी वर्दीवर उजव्या बाजूला छातीवर असलेल्या नेमप्लेटमधूनही आडनाव वगळले आहे.

**संकल्पनेचे स्वागत :**

पोलिस अधीक्षक कॉंवत यांनी राबविलेल्या या संकल्पनेचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे. परंतु काही लोकांनी पोलिस नियमांवरही बोट ठेवले आहे. परंतु आपण हा निर्णय सकारात्मक भावनेतून घेतल्याचा दावा कॉंवत यांनी केला आहे.

एखादा गुन्हा दाखल करताना पीएसओ, तपास करताना अधिकारी, कर्मचारी किंवा बंदोबस्ताच्या ठिकाणी आडनाव पाहून काही लोक उगाचच टीका करतात. परंतु पोलिसांना कोणतीही जात नसते. जातीवर आम्ही काम करत नाहीत. जनतेची सुरक्षा करणे हाच आमचा प्रयत्न असतो. त्यामुळे हा जातीयवाद थांबवावा, असेही एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# नमरा कॉलनीत समस्या कमी होईनात?

## तक्रार करूनही रस्त्यांची दुरवस्था कायम; कचऱ्याचे ढिग आणि तुंबलेल्या नाल्या नशिबी





गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्यांची कामे च करण्यात आलेले नसल्यामुळे रस्त्यांची स्थिती फार खराब असून या भागात अजूनही कच्चे रस्ते आहेत. त्यामुळे चांगले रस्ते होणे गरजेचे आहे.

सय्यद अर्शियान, नागरिक.

नमरा कॉलनी हा भाग बीड शहरातच येतो याचा पालिका आणि नेतेमंडळींना विसर पडला आहे. फक्त निवडणुकीपुरती नेत्यांना या भागाची आठवण येते. मात्र, समस्या सोडविण्याकडे कायम दुर्लक्ष करण्यात येते. नागरिकांना कमीतकमी मूलभूत सुविधा तरी मिळाव्यात. अरफात शेख, नागरिक.

बीड । दिव्य न्युज

शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना भौतिक सुविधासाठी झगडावे लगत आहे. स्वच्छता, पाणी, रस्ते या पायाभूत सुविधांकडे प्रशासनाचे कायम दुर्लक्ष राहिलेले आहे. मोमीनपुरा भागातील नमरा कॉलनीतही या समस्या कायम असून अंतर्गत रस्ते नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. याशिवाय तुंबलेल्या नाल्या आणि ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग यामुळेही सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

पायाभूत सुविधा नागरिकांपर्यंत पोचविणे हे पालिका प्रशासनाचे काम. परंतु बीड शहरात नागरिकांना मात्र या सुविधा मिळत नसल्याचे चित्र आहे. शहरातील इतर भागांप्रमाणेच नमरा कॉलनीतील नागरिकांना असुविधांचा सामना करावा लागत आहे. या भागातील मूलभूत समस्यांकडे पालिका पदाधिकाऱ्यांकडून कायम दुर्लक्ष करण्यात आले. आजही नागरिक चांगल्या रस्त्यांच्या प्रतीक्षेत आहेत. तसेच कचरा आणि नाल्यांची सफाई यासारख्या समस्यांना देखील नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे.याठिकाणच्या रस्त्यांनी वाहन चालविणे कठीण जात आहे. तुंबलेल्या नाल्या आणि रस्त्याच्या बाजूला साठेलले कचऱ्याचे ढीग यामुळे नागरिकांना प्रचंड दुर्गंधीचा सामना करावा लागत असून पालिकेच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. या भागातील नाल्यांची अनेकवर्षांपासून सफाई करण्यात न आल्याने प्रचंड घाणीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. महिनोमहीने पालिकेची घंटागाडी येत नसल्याने याभागातील कचरा व्यवस्थापन बिघडले असून रस्त्यावरच कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. त्यामुळे प्रशासनाने या समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे

### तक्रारींना केराची टोपली

याबाबत पालिकेला अनेकवेळा तक्रारी करण्यात आल्या. परंतु, दुर्लक्ष करण्यात आल्याने या भागातील नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०